# दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड,

TATA POWER

बॉंबे हाउस, २४, होमी मोदी स्ट्रीट, मुंबई- ४०० ००१, भारत, टेलिफोन: (९१ २२) ६६६५ ८२८२, फॅक्स: (९१ २२) ६६६५ ८८०१,
Website: www.tatapower.com, CIN: L28920MH1919PLC000567

TATA


## सार्वजनिक नोटिस

**वितरण व्यवसायासाठीच्या जोडणी सेवा दरांच्या पुनर्रचनेबाबत केलेल्या 'टाटा पॉवर कंपनी लिमीटेड - वितरण व्यवसाय' या याचिकेबाबतच्या हरकती आणि मतप्रदर्शने (केस क्रमांक ८२ - २०१७)**

१. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठ्याच्या इतर अटी) विनिमय, २००५ नुसार, वितरण व्यवसायाच्या जोडणी सेवा दरांची पुनर्रचना करण्याविषयीची याचिका टाटा पॉवर कंपनी लिमीटेडच्या वितरण व्यवसाय विभागातर्फे करण्यात आली आहे. ही याचिका विद्युत कायदा - २००३ अन्वये महाराष्ट्र विद्युत नियामक मंडळा(एमईआरसी किंवा आयोग)कडे सुपुर्द करण्यात आली आहे.

२. आयोगातर्फे ही याचिका २८ ऑगस्ट २०१७ रोजी स्विकारण्यात आली असून २००३ च्या विद्युत कायद्याच्या कलम ६४ (२) अन्वये सर्वसामान्यांकडून हरकती व मते मागवून घेण्यासाठी टाटा पॉवर - डी कंपनीने सार्वजनिक सूचना प्रकाशित करावी, असे सांगण्यात आले आहे.

३. आयोगाने टाटा पॉवर - डी च्या परवानाधारक क्षेत्रातील ग्राहकांसाठी २८ डिसेंबर २०१२ रोजी २०१२ चा खटला क्र. ४७ चा आदेश आणि २६ जून २०१५ रोजी २०१५ चा खटला क्र. १८ च्या आदेशामध्ये आकारांच्या अनुसूची मान्य केली होती.

४. त्यानंतर, ९ मे २०१७ रोजी मंत्रालयात 'भारतात व्यवसाय करणे-वीज मिळवणेबाबत' या विषयांवर बैठक आयोजित करण्यात आली होती. नवीन विद्युत जोडणी (१५० किलो व्हॅटपर्यंत) मिळवण्यासाठीच्या खर्चात घट व्हावी, यासाठी २५ टक्क्यांपर्यंत जोडणी सेवा दर कमी करण्याकडे या बैठकीचा उद्देश होता.

५. त्याही पुढे, समांतर वितरण परवान्यांच्या जोडणी सेवा दरांत लक्षवेधी फरक असून याचा फक्त टाटा पॉवर - डी कंपनीच्या स्पर्धात्मकतेवरच परिणाम होत नाही, तर त्यांमुळे ग्राहकांवरही भार पडतो आहे. म्हणूनच टाटा पॉवर - डी कंपनीने 'दरांची पुनर्रचना' करण्याबाबतही याचिका सादर केली आहे.

६. दरांची रचना:
खाली दाखवल्याप्रमाणे टाटा पॉवर - डी कंपनीने दरांच्या पुनर्रचनेसाठी याचिका सादर केली आहे.

| अनु क्रमांक | माहिती | टाटा पॉवर –डीचे सध्याचे दर (खटला क्रमांक ४७ – २०१२ आणि १८ - २०१५) (रुपये.) | सद्यपरिस्थितीत टाटा पॉवर – डीने सुचित केलेले दर (रुपये.) | बेस्टने सूचीत केलेले दर (खटला क्र. ८६ – २०१७) |
|---|---|---|---|---|
| | **नवीन जोडण्या आणि वाढीव भारासाठी सेवा जोडणी दर** | | | |
| १. | एल. टी. पुरवठा | | | |
| | सिंगल फेज | | | |
| १.१ | ५ किलो व्हॅटपर्यंतच्या भारासाठी | २००० | २००० | २००० |
| १.२ | ५ किलोव्हॅटपेक्षा अधिक व १० किलो व्हॅटपेक्षा कमी विद्युत भारासाठी | ३००० | २००० | २००० |
| | तीन फेज | | | |
| १.३ | २७ अश्वशक्तीपर्यंत गतीज ऊर्जा किंवा २० किलो व्हॅटपर्यंत भार | ३००० | ३००० | ३००० |
| १.४ | २७ अश्वशक्तीपेक्षा अधिक व ६७ अश्वशक्तीपेक्षा कमी गतीज ऊर्जा किंवा २० किलो व्हॅटपेक्षा अधिक व ५० किलोव्हॅटपेक्षा कमी अन्य भार | १९५०० | ६५०० | ६५०० |
| १.५ | ६७ अश्वशक्तीपेक्षा अधिक व १३४ अश्वशक्तीपेक्षा कमी गतीज ऊर्जा किंवा ५० किलो व्हॅटपेक्षा अधिक व १०० किलोव्हॅटपेक्षा कमी अन्य भार | ४०००० | १२००० | १२००० |
| १.६ | १३४ अश्वशक्तीपेक्षा अधिक व २०१ अश्वशक्तीपेक्षा कमी गतीज ऊर्जा किंवा १०० किलो व्हॅटपेक्षा अधिक व १५० किलोव्हॅटपेक्षा कमी अन्य भार | ६०००० | १२००० | १२००० |

७. टाटा पॉवर – डी च्या कार्यालयांमध्ये अर्ज केल्यानंतर खालील कागदपत्रांच्या प्रती मिळू शकतील.
   अ. सीडी (इंग्रजी)सह विस्तृत याचिकेची कागदपत्रे ( **द टाटा पॉवर कंपनी लिमीटेड** या नावे ७५ रुपयांच्या डीडी किंवा धनादेश किंवा रोख रकमेसह)
   ब. विस्तृत याचिका कागदपत्रे (इंग्रजी) (५० रुपयांच्या रकमेसह)
   क. विस्तृत याचिका कागदपत्रांची सीडी (इंग्रजी) ( २५ रुपयांच्या रकमेसह)

**कार्यालये :**

| कार्यालये | पत्ता | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| नोंदणीकृत कार्यालय | श्री. राजेंद्र दोशी, द टाटा पॉवर कंपनी लिम्मीटेड, बॉम्बे हाऊस, २४, होमी मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ | ६७१७ १०३२ |
| कारनाक | श्रीमती शेली त्रिवेदी, द टाटा पॉवर कंपनी लिमीटेड, कॉर्पोरेट सेंटर बी, ३४ संत तुकाराम मार्ग, कारनाक बंदर, मुंबई - ४००००९ | ६७१७ १४४८ |
| धारावी | श्री. तेजिंदरसिंग हीर, द टाटा पॉवर ग्राहक संपर्क केंद्र, धारावी रिसीव्हिंग केंद्र, शालीमार औद्योगिक केंद्राजवळ, माटुंगा (पूर्व), मुंबई - ४०० ०१९ | ६७१७ २३६३ |
| बोरीवली (पश्चिम) | श्रीमती विजयश्री अय्यर, टाटा पॉवर ग्राहक संपर्क केंद्र, दुकान क्रमांक २, ३, एकता मुख्य इमारत, लिंक रस्ता, एस्के रिसॉर्टजवळ, बोरिवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०९२ | २८९१ ३३३६ |
| अंधेरी (पूर्व) साकी | श्री. युसुफ नादाफ, टाटा पॉवर ग्राहक संपर्क केंद्र, युनिक क्रमांक ८ - ५५, कॉर्पोरेट अॅव्हेन्यू, साकी - विहार रस्ता, साकी विहार टेलीफोन एक्सचेंजच्या समोर, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०७२ | ६५१८१६७५ |

८. आयोगाने टाटा पॉवर डीला जनतेकडून आपल्या याचिकेबाबत या सूचनेद्वारे सूचना/ आक्षेप मागवण्याच्या सूचना दिल्या आहेत. सूचना/आक्षेप इंग्लिश किंवा मराठी भाषेत सहा (१-६) प्रतीमध्ये सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, सेंटर नंबर १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई- ४००००५, किंवा फॅक्स किंवा इमेलद्वारे (फॅक्स: २२१६३९७६, इमेल: mercindia@merc.gov.in द्वारे मंगळवार २६ सप्टेंबर २०१७ रोजीपर्यंत सेवेच्या पुराव्यांसह श्री. भास्कर सरकार, प्रमुख- नियामक, टाटा पॉवर कंपनी लिमिटेड, बॅकबे रिसिव्हिंग स्टेशन, १४८, लेफ्टनंट जनरल जे. भोसले मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई- ४०००२१, महाराष्ट्र, दूरध्वनी: (९१ २२) ६१७ २९०१, इमेल आयडी bhaskar.sarkar@tatapower.com येथे पाठवावेत. त्यावर पाठवणाऱ्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि इमेल पत्ता असल्यास देण्यात यावा. सूचना/ आक्षेप एखाद्या संस्थेद्वारे किंवा ग्राहकांच्या वर्गाद्वारे पाठवण्यात आले आहेत का हे सूचित करण्यात यावे. पाठवणाऱ्याची वैयक्तिक सुनावणी करण्याची इच्छा आहे का हेही सूचित करण्यात यावे जेणेकरून आयोगाकडून **सेंट्रम हॉल, पहिला मजला, सेंटर नंबर १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई- ४००००५ येथे बुधवार दिनांक ४ ऑक्टोबर २०१७ रोजी सकाळी ११.००** वाजता सार्वजनिक सुनावणी दरम्याम संधी दिली जाईल आणि त्यासाठी स्वतंत्र सूचना देण्यात येणार नाही.

९. टाटा पॉवर- डी मंगळवार दिनांक २६ सप्टेंबर २०१७ पर्यंत प्राप्त झालेल्या प्रत्येक सुचना व आक्षेपांना तीन दिवसांच्या आत, परंतू दिनांक २९ सप्टेंबर २०१७ पूर्वी उत्तरे पाठवील. टाटा पॉवर ने दिलेल्या उत्तरांवर जोड अर्ज एकतर सार्वजनिक सुनावणीच्या वेळी किंवा दिनांक ६ ऑक्टोबर २०१७ पर्यंत सादर करु शकतील.

१०. याचिकेचे सविस्तर कागदपत्र टाटा पॉवर-डीच्या www.tatapower.com या संकेत स्थळावर आणि आयोगाच्या ww.mercindia.org.in/www.merc.gov.in या संकेतस्थळावर डाऊनलोड करुन घेण्यायोग्य (मोफत) उपलब्ध आहे.

स्वाक्षरी
नाव: भास्कर सरकार
पद: प्रमुख - नियमन
द टाटा पॉवर कंपनी लिमीटेड

ठिकाण : **मुंबई**
दिनांक: **गुरुवार, ३१ ऑगस्ट २०१७**